क्र.साप्रवि/रवका/न.क्र.५/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.

# प्रशासकीय परिपत्रक क्र.७१ दिनांक ०५/१०/२००६

विषय : सेवाविनियम क्र.१०३ (ख) मध्ये माहिती व तंत्रज्ञान संवर्गाचा समावेश करणेबाबत.

......

पूर्वीच्या म.रा.वि.मंडळ कर्मचारी सेवाविनियम क्र.१०३ (ख) (एक) मधील तरतुदीनुसार, अतिरिक्त उच्च शैक्षणिक अर्हता संपादन करण्यास प्रोत्साहन मिळावे व अतिरिक्त उच्च शैक्षणिक अर्हता संपादित केल्याबद्दल संबंधित कर्मचा-याला एक जादा वेतनवाढ द्यावी अशी तरतूद करण्यात आली आहे. सदर तरतुदीचा लाभ म.रा.विद्युत वितरण कंपनीच्या माहिती तंत्रज्ञान संवर्गातील कर्मचाऱ्यांना द्यावा आणि त्यासाठी विशिष्ट उच्च शैक्षणिक अर्हता देखील विहित करावी तसेच विद्यमान सेवाविनियम क्र.१०३ (ख) (एक) मध्ये असलेली संदिग्धता दूर करावी याबाबतचा प्रस्ताव म.रा.विद्युत वितरण कंपनीच्या मा.व्यवस्थापकीय संचालक यांच्या विचाराधीन होता.

२. या अनुषंगाने सर्वंकष विचारांती व्यवस्थापकीय संचालक (मराविविकंम) यांनी, संचालक (संचलन) व संचालक (वित्त) यांच्याशी विचारविनिमय करुन कर्मचारी सेवाविनियम क्र.१०३ (ख) (एक) मध्ये खालील प्रमाणे सुधारणा करण्यास मंजुरी दिली आहे.

(i) माहिती तंत्रज्ञान संवर्गाचा क्र.१०३ (ख) (एक) च्या खाली (ट) या ठिकाणी समावेश करणे आणि त्यासाठी निम्ननिर्देशित अतिरिक्त उच्च शैक्षणिक अर्हता विहित करणे.

**(ट) माहिती तंत्रज्ञान संवर्ग :-**

१) संगणक विषयातील पदव्युत्तर पदवी

२) मान्यताप्राप्त विद्यापीठाने दिलेली व्यवस्थापन/प्रशासन (म्हणजेच व्यवसाय व्यवस्थापन/व्यवसाय प्रशासन/खरेदी-विक्री व्यवस्थापन/भांडार व्यवस्थापन/कर्मचारीवर्ग व्यवस्थापन आणि वित्तीय व्यवस्थापन इत्यादी) या विषयातील पदव्युत्तर पदवी किंवा भारत सरकारने/राज्य सरकारने पदव्युत्तर पदवी समतूल्य म्हणून मान्यता दिलेली, मान्यताप्राप्त विद्यापीठाची व्यवस्थापन/प्रशासन यामधील कोणतीही शैक्षणिक अर्हता.

(ii) सेवा विनियम क्र.१०३ (ख) (एक) अंतर्गत जादा वेतनवाढ मिळण्यासाठी दावा करणाऱ्या जनसंपर्क संवर्गातील कर्मचारी वगळता (पत्रकारीता विषयातील पदव्युत्तर पदवी पाठ्यक्रम दोन वर्षापेक्षा कमी कालावधीचा असल्या कारणाने) इतर संवर्गातील कर्मचाऱ्यांकरिता सदर विनियमामध्ये विहित करण्यात आलेल्या अभ्यासक्रमांचा कालावधी किमान दोन वर्षाचा आवश्यक असल्याचे ठरविणे आणि सदर बाबीचा सेवा विनियम क्र.१०३ (ख) (दोन) खालील 'टीप' असा अंतर्भाव करणे.

(iii) परिणामी, लेखा संवर्गातील कलम ४ [क्र.१०३ (ख) (च) (४)] वगळणे.

३. पूर्वीच्या म. रा. वि. मंडळाच्या किंवा महावितरण कंपनीच्या सेवेत असताना सेवा विनियम क्र.१०३ (ख) (एक) मध्ये विहित केलेल्या शैक्षणिक अभ्यासक्रमास प्रवेश घेऊन किमान दोन वर्षाची सेवा पूर्ण केल्यानंतर सदर उच्च शैक्षणिक अर्हता संपादन करणारे कर्मचारी (संवर्गनिहाय) परीक्षेच्या निकालाच्या तारखेपासून एक जादा वेतनवाढ मिळण्यास पात्र रहातील.

म्हणजेच कंपनीच्या सेवेत प्रवेश करण्याअगोदर किंवा दोन वर्षांची सेवा पूर्ण होण्याअगोदर सदर परीक्षा उत्तीर्ण होणारे कर्मचारी जादा वेतनवाढ मिळण्याच्या लाभास पात्र असणार नाहीत.

४. सेवा विनियम क्र.१०३ (ख) मधील इतर तरतुदी अबाधित रहातील.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक निर्गमित झाल्याच्या तारखेपासून लागू होईल.

( सु. य. पाटील )
मुख्य महाव्यवस्थापक (क)

प्रत :
कार्यकारी अभियंता तत्सम व त्यावरील दर्जाचे अधिकारी यांना
महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीनुसार.

K/Adm.Cir.F.N.5
05/10/06